# बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण – एक अभ्यास

**सहा. प्रा. सुचित्रा किशोर लाउतकर**
डॉ. आंबेडकर इंस्टिटयूट ऑफ सोशल वर्क,
न्यू. कैलाशनगर, मानेवाडा रोड, नागपूर
Email : suchitralautkar0@gmail.com
Mob No : 9307564527

---

***सारांश (Abstract) :***

*या संशोधनात कामठी नगरपरिषद क्षेत्रातील महिलांच्या बचत गटांवर आधारित आर्थिक सक्षमीकरणाचा अभ्यास करण्यात आला. महिलांवर मुलाखती व गटचर्चा यांच्याद्वारे माहिती संकलित करण्यात आली. निष्कर्षांवरून हे सिद्ध झाले की बचत गटांमुळे महिलांच्या उत्पन्नात वाढ, आर्थिक शिस्त, सामाजिक सहभाग व निर्णयक्षमतेत सकारात्मक बदल झाले आहेत. अशाप्रकारचे गट महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात.*

---

**प्रस्तावना** (Introduction) :

भारतात महिलांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक सक्षमीकरणासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यामध्ये बचतगट (Self Help Groups – SHG) हे एक प्रभावी साधन ठरले आहे. बचत गटांच्या माध्यमातून महिला एकत्र येतात, नियमित बचत करतात, आर्थिक गरजांसाठी कर्ज घेतात आणि स्वत:चा व्यवसाय सुरू करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास, निर्णयक्षमता व आर्थिक साक्षरता वाढते. या अभ्यासात कामठी नगरपरिषद अंतर्गत महिलांच्या बचत गटांचा अभ्यास करण्यात आल ाआहे.

**संज्ञा स्पष्टता** (Definition) :

बचत गट (Self Help Groups – SHG) :

बचत गट म्हणजे महिलांचे एक स्वयं–संयोजित गट असतो, जो नियमित बचत करतो, आपसात कर्जव्यवहार करतो आणि महिला सदस्यांना आर्थिक सक्षमीकरणासाठी मदत करतो.

आर्थिक सक्षमीकरण (Economic Empowerment) :

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे, त्यांना उत्पन्नाचे साधन मिळवून देणे व स्वत:चे आर्थिक निर्णय घेण्याची क्षमता प्राप्त करणे ही प्रक्रिया म्हणजे आर्थिक सक्षमीकरण.

**महिलांचे सबलीकरण :**

प्रत्येक राष्ट्रातील प्रत्येक स्त्री किंवा पुरूष, बालक, वृद्ध, अपंग, सुदृढ यांचा सर्वांगीण विकास झालेला असेल तर त्या देशाचा बहुमुखी विकास होतो. परंतु जागतिक पातळीवर विविध स्तरावर महिलांचा विकास झालेला नाही. त्याकरीता शासन सामाजिक संस्था यांनी त्यांचा सर्वांगीण विकास करण्याकरीता अनेक योजना

Research Hub International Journal

राबविण्यात आहेत. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात महिलांचे सबलीकरण करण्याचा प्रयत्न केला गेला. स्वातंत्र्यानंतर सबलीकरणाबाबत शासनाने अनेक धोरणे राबविली आहे. तसेच महिलांचे सबलीकरणाकरिता २००१ हे वर्ष महिला सबलीकरण वर्ष जाहीर केले होते. सबलीकरण प्रकिया सतत चालणारी असली तरी प्रत्येक टप्प्यावर सबलीकरणाचे संदर्भ बदलत असतात.

**सबलीकरणाची आवश्यकता—गरज :**

१. देशातील सर्वांगीण साधन संपत्तीच्या विकासासाठी सबलीकरण गरजेचे आहे.
२. महिला सबलीकरणामुळे स्त्री—पुरूष सर्वच स्तरावर समानता प्रस्थापित होईल त्यामुळे समतोल विकास संकल्पना अस्तित्वात येईल.
३. स्त्री घटकांना मानसिक, सामाजिक, आर्थिक विकासाकरिता सबलीकरण आवश्यक आहे.
४. महिलांचे आरोग्य, मानसन्मान वाढविणे, जीवनमान उंचावणे, समाजात निर्भयतेने जगणे.
५. महिला सबलीकरणाच्या दृष्टीने समतोल साहाय्याकरिता स्वावलंबन, महिला कौशल्य, स्वास्थ रोजगार, निर्णय प्रक्रियेत सहभाग, तसेच समाजाच्या वैचारिक दृष्टिकोनातून सकारात्मक बदल घडवून आणण्याकरिता महिला सबलीकरण आवश्यक आहे.
६. राजकीय क्षेत्रातील दुर्गुणांचा नाश करण्याकरिता व निकोप राजकीय क्षेत्रात प्रवेश करण्याकरिता सबलीकरण गरजेचे आहे.
७. महिलांना आर्थिक समता, हक्क, अधिकार, निर्णय, कर्तव्य, स्वअस्तित्व याची जाणीव व्हावी.
८. जागतिकीकरण्याच्या प्रक्रियेत हरवलेली माहिती हे कलंक पुसून काढण्याकरिता व स्वत:चे कर्तृत्व सिद्ध करण्याकरिता व स्वत:च्या ठायी असलेल्या गुणांचा यथायोग्य विकास करणे.
९. पुरूषांना स्त्रीच्या त्यागाची, कर्तव्याची, सहनशीलतेची जाणीव याकरिता महिला सबलीकरण अशा अनेक जबाबदाऱ्या पेलू शकतील.
१०. महिला सर्वच क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने अनेक जबाबदाऱ्या पेलू शकतील.
११. संपूर्ण समाज सुख—समाधान, आनंदाने व समाजात जबाबदार म्हणून कार्य करण्याकरिता सबलीकरण आवश्यक आहे.
१२. समाजामध्ये मुलगी, पत्नी, माता या भूमिका समर्थपणे सांभाळण्याकरिता आवश्यक आहे.
१३. महिलांचे संघटन मजबूत होण्याकरिता आणि महिलांवरील अन्याय, अत्याचार, गुन्हेगारी दूर होण्याकरिता महिलांचे सबलीकरण आवश्यक आहे.

**स्वयंसहायता बचत गट :**

एस. जी. एस. वाय च्या गरिबांना संघटित करण्याच्या दृष्टिकोनामागे, गरिबांकडे असलेल्या स्वत:ला मदत करण्याच्या मोठया गुणाचा उपयोग करुन घेणे ही धारणा आहे. समाज जागृतीमुळे गरीबांना त्यांची स्वत:ची संघटना तयार करणे शक्य होते.

**स्वयंसहायता बचत गटाची ठळक वैशिष्टे :**

१) किमान १० ते २० महिला/पुरुषांनी एकत्र येवून आपल्या शक्तीनुसार दरमहा बचत करावी.

२) अपंग व लघुसिंचन प्रकल्पाचे गटातील सदस्यांची संख्या ५—२० पर्यंत असली तरी चालते.



Research Hub International Journal

तसेच दुर्गम भाग जसे वाळवंट, डोंगराळ प्रदेश आणि विखुरलेल्या विरळ लोकसंख्येच्या प्रदेशातही गट ५ ते २० सदस्यांचा चालु शकतो. असे प्रदेश कोणते हे राज्यस्तरीय एस.जी.एस. वाय समिती ठरवते.

३) गटातील सर्व सभासद हे दारिद्रय रेषेखालील असतात. अपवादात्मक परिस्थितीत गटाचे संमतीने २० ते ३० टक्के दारिद्रय रेषेच्या वरील कुटूंबातील सदस्य घेता येतील. गटामध्ये एकाच कुटूंबातील एकापेक्षा अधिक व्यक्तींचा अंतर्भाव नसावा तसेच एका व्यक्तीला एकापेक्षा अधिक गटांचा सदस्य होता येत नाही.

४) गटांच्या दरमहा बैठका घेणे आवश्यक असते.

५) गटाच्या कामकाजाचे इतिवृत्त बचतीचा, कर्जाचा हिशोब छापील नोंद वहयात ठेवला जातो.

६) गट स्वत:साठी आचारसंहिता ठरवतो.

७) गटाची आठवडयातून किंवा पंधरवाडयातून नियमित सभा होते. हे गट प्रत्येक सभेची कार्यसुची तयार करण्यास व कार्यसुचीप्रमाणे निर्णय घेण्यास समर्थ असावीत.

८) स्थूलमानाने स्वयसहाय्य गट हे अनौपचारिक असतात.

९) गटातील सभासदांना संघटित करणे, क्षमता बांधणी करणे, हिशोबाचे व व्यवसायाचे प्रशिक्षण देणे या कामी स्वयंसेवी संस्थाचे सहकार्य घेण्यात येते.

**बचत गटांकरिता दशसूत्री पालन :**

सध्या अस्तित्वात असलेल्या गटांचे नियमित समूह, अनियमित समूह आणि बंद/निष्क्रय समूह अशा तीन प्रकारांत वर्गीकरण केल्यानंतर त्यांना समुहांना दशसूत्रीचे प्रशिक्षण देण्यात यावे. दशसुत्रीमधील दहा सूत्रे खाली दिली आहेत. त्यांचे पालन करण्यासाठी गटाला मार्गदर्शन करावे.

**१) नियमित बैठक :**

शक्यतो गटाची बैठक दर आठवडयाला घेण्यात यावी. असे शक्य नसल्यास दर पंधरा (१५) दिवसांनी बैठक घेण्याविषयी प्रोस्ताहित करावे. तसेही न झाल्यास मात्र दर महिन्याच्या गटाची बैठक होणे आवश्यक आहे. विषयपत्रिकेवर साधारणपणे सदस्यांची अनुपस्थिती, जमाबचत, कर्ज परतफेड, कर्ज मागणी, गटाच्या क्षमतेनुसार पुढे सूक्ष्म गुंतवणूक आराखडा, बॅंक कर्ज इत्यादी विषयांचा समावेश करावा व त्याप्रमाणे कार्यवृत्तांत/इतिवृत्त लिहिण्यासाठी मार्गदर्शन करावे.

**२) नियमित बचत :**

गटाची बैठक दरमहा होत असल्यास ठरलेली रक्कम सदस्याने बैठकीच्या ठिकाणी स्वत: समक्ष जमा करावी. बैठक दर पंधरा (१५) दिवसांनी घेतल्यास बचतीची रक्क्म २ टप्यात अर्धी–अर्धी भरावी. बैठक आठवडयाा घेतल्यास महिन्याची रक्कम दर आठवडयाला समान भागात प्रत्यक्ष सभेच्या दिवशी भरावी.

Research Hub International Journal

### ३) अंतर्गत कर्ज वितरण :

गटाने बचतीची रक्कम बॅकेत जमा न ठेवता ती रक्कम गटातील अत्यंत गरजू सदस्यांना त्यांच्या गरजांच्या प्राधान्य क्रमाने विचार–विनिमय करुन अंतर्गत कर्ज म्हणून वितरित करावी.

गटातील जमा रक्कम व सभेच्या दिवशी मागणी रक्कम यांचा मेळ घालण्यासाठी मागणीचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यासाठी मार्गदर्शन करावे.

### ४) कर्जाची नियमित परतफेड :

गटाकडून घेतलेल्या कर्जाची निसमित परतफेड करणे ही गटाची सामूहीक जबाबदारी आहे. सभेच्या दिवशी घेतलेले अंतर्गत कर्ज परतफेड करण्यासाठी सभेतच नियोजन करावे.व त्याप्रमाणे नियमित परतफेड होत आहे हे कटाक्षाने पहावे. याबाबतचे नियम गटाने स्वत: ठरवून घ्यावेत नियमित कर्जफेड करणारा गट पुढे मोठया कर्जासाठी अधिक योग्य समजावा.

### ५) गटाचे लेखे अद्ययावत ठेवणे :

गटाचे लेखे हे गटाच्या कामकाजाचा आरसा आहे. लेखे रोजच्या–रोज अद्ययावत ठेवणे गटाची मुलभूत जबाबदारी आहे. स्वयंसहाय्यता गटाचे लेखा नमूने परिशिष्ट क्र.२ मध्ये देण्यात आलेले आहेत.

### ६) नियमित आरोग्याची काळजी घेणे :

गटाच्या १००% सदस्यांकडे शौचालय असावे व त्यांनी त्यांच्या कुटूंबातील सर्व सदस्यांनी शौचालयाचा नियमित वापर करावा. तसेच महिलेच्या वैयक्तिक आरोग्याची काळजी, तिच्या कुटूंबातील सदस्यांच्या आरोग्याची काळजी, आरोग्य विषयक जाणिव–जागृती शिबिरे, संदर्भ सेवा इत्यादीबाबत गटाच्या बैठकीत नियमित चर्चा करण्यात यावी. शक्य असल्यास गटाची बैठकीची तारीख/वार निश्चित करुन ANM अशा वर्कर MPW किंवा डॉक्टर्स यांना मार्गदर्शनास बोलवावे.

### ७) निरंतर शिक्षण आणि साक्षरता :

गटातील सर्व सदस्यांची १००% साक्षरता व त्यांच्या कुटूंबातील १००% बालके त्या–त्या वयोगटानिहाय अंगणवाडी/बालवाडी, प्राथमिक/माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये दाखल करण्यात यावीत तसे नसल्यास अशा कुटूंबाला गटातून अर्थसहाय्य व मार्गदर्शन देण्यात यावे. याशिवाय सदस्य महिलेची साक्षरता, कुटूंबातील अन्य व्यक्तीची साक्षरता, वयोगट निहाय मुलांचे शिक्षण व दर्जा १००% साक्षर व उच्च शिक्षित कुटूंबाचा पंचायत राज संस्थामार्फत गौरव, शाळा इत्यादीबाबतीत शाळा व स्वयंसहाय्यता गटामध्ये समन्वयासाठी चर्चा करण्यात यावी. आवश्यकतेनुसार मुख्याध्यापक/शिक्षक यांना चर्चेसाठी निमंत्रित करावे.

### बचतगटामुळे स्त्रियांच्या जीवनात घडून येणारे परिवर्तन :

ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाचा स्थानिक लोकांचा सहभाग, विकासाचे नियोजन, अंमलबजावणी आणि मूल्यमापनापर्यंत स्वयं–साहाय्यता बचत गट सक्रिय झालेला आहेत. यामुळे गावागावात व वाडया–वस्त्यांवर बचत संकलनाच्या कामाला चालना मिळाली. शिवाय ग्रामीण विकासासाठी महिलांची

कृतिबद्ध चळवळ म्हणून विकासाच्या संधी आणि महिलांच्या प्रगतीत येणाऱ्या अडथळयांचे निराकरण करून महिलांचा विकासाचा विचार विविध स्तरावर केल्याने महिलांना जिव्हाळा वाटणारे , स्वाभिमानी व सामर्थ्याने उभे करणारे केंद्र म्हणून स्वयं–सहाय्यता बचत गटाचे फायदे होतात. हे फायदे विविध स्तरावर होतात. ते पुढीलप्रमाणे आहेत.

**व्यक्तीगत फायदे :**

१. **जन्मजात गुणांचा विकास :** प्रत्येक व्यक्तीत जन्मजात काही ना काही गुण असतात. ह्या गुणांना संधी मिळाल्यास व्यक्तीचा फायदा मिळाल्यास होतो. म्हणून स्वयं–सहाय्यता बचत गटात महिलांच्या गुण विकासास संधी मिळाल्याने विकास झालेला आहे. संघटन, नेतृत्व, संभाषण कौशल्य, स्वशक्ती अशा गुणांचा विकास झालेला आहे. तसेच आत्मसन्मान, आत्मनिर्भरता धाडस यात गुणात्मक बदल झाले आहेत.

२. **कर्तृत्वाला दिशा व संधी :** सामाजिक, कौटुंबिक, धार्मिक, आर्थिक क्षमता इ. बंधनांमुळे महिलांच्या कर्तृत्वाला संधी प्राप्त होत नव्हती. परंतु स्वयं–सहाय्यता बचत गटामुळे महिलांच्या कर्तृत्वाला संधी व दिशा प्राप्त झालीआहे. उद्योग, व्यवसाय, राजकारण संधी, समाजात निर्णय धेण्यात सहभाग अशा संधी प्राप्त झाल्या आहेत.

३. **व्यक्तिमत्वाचा विकास :** स्वयं–सहाय्यता बचत गटामुळे महिलांच्या अंगभूत शक्तीत वाढझाली आहे. निर्णयक्षमता, कौशल्यवृद्धी, बँक व्यवहार, व्यवस्थापन, उत्तम हिशोबनीस, संभाषण कला, नेतृत्वगुण, तडजोड, सहनशीलता, आत्मविश्वास, राजकीय सहभाग यामुळे व्यक्तिमत्व विकास झालेला आहे. ग्रामीण महिलांच्या व्यक्तिमत्व विकासाबाबत नवनवीन गोष्टी बघायला व शिकायला मिळतात. बँक व्यवहार शिकता येतो. तसेच आपण स्वत:च्या पायावर उभे राहून भविष्यामध्ये काहीतरी करावे अशी ईच्छाशक्ती जागृत होऊन महिला त्यासाठी धडपडत असते.

४. **कुटुंबात मानाचे स्थान :** स्वयं–सहाय्यता बचत गटामुळे महिलांना पैशाचे व्यवहार कळू लागले आहेत. महिला बचत व गुंतवणूक करू लागल्या आहेत. कुटुंबातील अडचणीच्या वेळी पैसा मिळू लागल्यामुळे कौटुंबिक समस्या सोडवू लागल्या आहेत. घरातील निर्णय घेऊ लागल्या आहेत. त्यामुळे कौटुंबिक महत्व वाढलेले आहे. त्याचा फायदा महिलांना गटामुळे झाला आहे.

५. **स्वशक्ती व समूहशक्तीची जाणीव :** स्वयं–सहाय्यता बचत गटामुळे महिलांची उत्पन्नवृद्धी होऊन कमावती झाल्याने स्वशक्ती जागृती होते. शिवाय स्वशक्ती समूहशक्ती जागृत करते. कारण स्वयं–साहाय्यता बचत गटामुळे स्वत:चे स्थान समजू शकते. स्वत:ची व समूहाची ताकद पूर्णपणे वापरात आणता येते.

६. **हक्काचे व्यासपीठ :** स्वयं–सहाय्यता बचत गट हे महिलांनी स्वत:चे हितगूज स्वत:च्या समस्या, चर्चा, प्रबोधन करण्यासाठी स्वत: निर्माण केलेले व्यासपीठ आहे. या व्यासपीठावर पुरूष हक्क सांगू शकत नाही. हे व्यासपीठ सतत सतर्क असते. या व्यासपीठामुळे सामाजिक अन्यायाला वाचा फोडता येते. संघर्षातून न्याय मिळविता येतो.

७. **सत्ता, संपत्ती आगमन :**स्वयं–साहाय्यता बचत गटामुळे महिलांना राजकीय व आर्थिक सत्ता प्राप्त झालेली आहे. सत्तेच्या बळावर महिलांनी संपत्ती स्वत:च्या नावावर निर्माण केलेली आहे. तसेच सत्तेतील वाटा महिला निश्चित करून घेतात. त्याचप्रमाणे पतीच्या संपत्तीतील वाटा बरोबरीने नोंदवितात. हा फायदा गटामुळे झालेला आहे.

८. **नवनवीन शिकण्याची संधी प्राप्त :** स्वयं–सहाय्यता बचत गटामुळे मत स्वातंत्र्य, तसेच घराबाहेर पडण्याची संधी प्राप्त होते. नवनवीन गोष्टी बघायला व शिकायला मिळतात. बँक व्यवहार शिकता येतो. तसेच स्त्रियांमध्ये आपण स्वत:च्या पायावर उभे राहून भविष्यामध्ये काहीतरी करावे याची ईच्छा जागृत होऊन त्यासाठी ती धडपड असते.

**सामाजिक फायदे :**

१. समूहशक्तीची जाणीव होते .
२. विचारांची देवाणघेवाण करता येते.
३. सामाजिक दर्जा उंचावतो.
४. समाजात दबावगट निर्माण होतो.
५. संघटन व नेतृत्वाने समाजात महिलांच्या स्थानाविषयी पुरूष दृष्टिकोन परिवर्तन होते.
६. समूहाचे प्रश्न, गावाचे प्रश्न यावर कल्पना व उपाय यावर देवाणघेवाण करता येते.
७. सर्वांसाठी एकाने, एकासाठी सर्वांनी धडपड हे समीकरण वृद्धिंगत होते.
८. मजबूत महिला संघटनाची निर्मिती होते.
९. स्त्री–पुरूष समानता निर्माण होते, त्यामुळे समाज सुजाण सशक्त होऊन देश बलवान होतो.
१०. साक्षरता वाढीस लागते.
११. पीडित व मागासवर्गीय महिलांच्या गरजा भागविण्यासाठी उपयुक्त ठरते.
१२. महिलांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावतात.
१३. हक्क व अधिकारांविषयी जागरूकता येते.
१४. महिलांच्या गतिशीलता वाढीस स्वयं–सहाय्यता बचत गटामुळे मदत मिळते.
१५. स्वयं–सहाय्यता बचत गटामुळे महिलांना मानसिक आधार मिळतो.
१६. नेतृत्व गुणात वाढ होते.
१७. महिलांच्या विकासाकरिता शासकीय निर्णयांची माहिती गटामुळे मिळू शकते.
१८. स्वयं–सहाय्यता बचत गटाने महिलांना समाजात समान दर्जा, संधी, हक्क, आर्थिक स्वातंत्र्य व महत्व प्राप्त करून दिले आहे.

**आर्थिक फायदे :**

१. **बचतीच्या सवयी :** स्वयं–सहाय्यता बचत गटामुळे सभासदास नियमित बचत करण्याची सवय लागते. तसेच गटातील बचतीला सुरक्षितता मिळते. शिवाय बचत गटातील सभासदांना गरजा पूर्ण करण्यासाठी वापरली जाते.एकूणच बचत सुरक्षित राहाते.
२. **कर्जपुरवठयाच्या सोयी:** स्वयं–सहाय्यता बचत गट हे अनुत्पादक कर्ज देते. आजारपण, बाळंतपण, लग्नकार्य, शिक्षण, घरबांधणी, घरदुरूस्ती अशा कारणाकरिता कोणतीही बँक कर्ज देत नाही. परंतु गटामार्फत ताबडतोब या कार्याकरिता कर्ज मिळतात.
३. **विनातारण कर्जाची सुविधा :** स्वयं–सहाय्यता बचत गटातील सभासद भूमिहीन अल्पभूधारक, कष्टकरी वर्गातील असल्याने कर्जासाठी तारण नसल्याने बँका, पतसंस्था कर्ज देत नाहीत. परंतु गटामार्फत विनातारण कर्ज मिळू शकते.
४. **सावकारी पाशातून मुक्तता :** सावकारी कर्ज विनातारण मिळत असले तरी त्या कर्जाचा व्याजदर

Research Hub International Journal

दामदुपटीचा असल्यामुळे महिला सावकारी कर्जाच्या जाळयात कायमची राहत असे. त्यापायी सावकार जमीन, घर इ. वस्तूंचा ताबा मिळवितो. परंतु गटातील कर्जाचा व्याजदर अल्प असल्याने महिलांचा आर्थिक विकास झालेला आहे.

५. **गरजेच्या समयी आर्थिक मदत** : स्वयं–सहाय्यता बचत गटाचे कर्ज विनातारण, कागदपत्रांच्या त्रासाशिवाय, केवळ सहसभासदाच्या हमीवर ताबडतोब मिळते. ऐन गरजेच्या वेळी मिळणारे कर्ज हे महिलांना लाखमोलाचे वाटते. कोणत्याही संकटसमयी गटातील कर्ज उपलब्ध होतात. हा फायदा सभासदांना मिळतो.

६. **कारभारात पारदर्शकपणा** : स्वयं–सहाय्यता बचत गटाचा कारभार सर्वांसमोर सभेत होत असतो. त्यामुळे पारदर्शकपणा राहातो. व्यवहाराबाबत शंकाकुशंका राहात नाहीत. कारभार चोख असतो. रेकॉर्ड व्यवस्थित असते.

७. **पतक्षमतेत वाढ** : गटातील सभासदांच्या सहकार्याने प्रसंगी दबावाने कर्ज परतफेड वेळेवर व ठरलेल्या हप्त्यात होत असल्याने ही रक्कम कर्जवाटपासाठी वापरता येते. त्यामुळे गटाची भांडवलनिर्मिती होऊन पतक्षमता वाढते.

८. **रोजगारनिर्मिती** : स्वयं–सहाय्यता बचत गटामुळे व्यावसायिक प्रशिक्षण मिळू शकते. व्यवसायास भांडवल मिळते. तसेच उत्पादित वस्तूनां बाजारपेठ सुविधा उपलब्ध होते. त्यामुळे उद्योगांची निर्मिती होऊन स्वत:ला व इतर सभासदांना रोजगार प्राप्त होतो. बेकारी कमी होते. त्यामुळे दारिद्र्य निर्मूलन होते.

९. **व्यवस्थापन कौशल्यात वाढ** : स्वयं–सहाय्यता बचत गटात आल्याने प्रत्येक महिलेस हिशोब ठेवण्याचे ज्ञान, व्यवहारज्ञान, परिपक्वता, संघटन कौशल्य, सभेचे व्यवस्थापन, व्यवहाराच्या नोंदी इ. गोष्टी पार पाडाव्या लागतात. याकरिता व्यवस्थापन कौशल्य लागते. त्याचे शिक्षण गटातून प्राप्त होत असते.

१०. **बँक व्यवहाराची माहिती** : स्वयं–सहाय्यता बचत गटामुळे प्रत्येक सभासदाला गटाचे व्यवहार करण्यासाठी बँकेत जावे लागते. त्यामुळे बँकेशी करार, कर्जपुरवठा, पैसे काढणे आणि भरणे बँकेमार्फत कर्ज देणे, कर्ज भरणे, धनादेश वापर अशा बँक व्यवहारांची माहिती मिळू शकते.

**राजकीय फायदा :**

गटाचे नेतृत्व करताना राजकीय नेतृत्वात सहभाग मिळू लागलेला आहे. हे गटागटांतून दिसू लागले आहे. भारतीय राज्यघटनेने महिलांना समान हक्क दिले आहेत. त्यांची अंमलबजावणी करण्याकरिता महिलांना ३३% आरक्षण स्थानिक स्वराज्य संस्थात ठेवलेले आहे. परंतु महिलांनी क्षमता, कौशल्य, नेतृत्व या गुणांच्या बळावर आणि गटाचा सभासद म्हणून गावकऱ्यांच्या पाठिंब्यावर राजकीय क्षेत्रात प्रवेश मिळवलेला असून त्या लोकशाही मूल्यांची जोपासना करू लागल्या आहेत. महिलांचे राजकीय नेतृत्व समाज सुरक्षेच्या दृष्टीने महत्वपूर्ण मानले जाते. महिला गावपातळीवर सरपंच अशी पदे मिळवीत आहेत. गटामुळे राजकीय लाभ महिलांना होत आहे.

**संशोधन क्षेत्र व विश्व (Research Area & Universe) :**

**संशोधन क्षेत्र** : कामठी नगर परिषद, नागपूर जिल्हा, महाराष्ट्र

**संशोधन विश्व (Research Universe)** : कामठी नगर परिषद अंतर्गत कार्यरत २० हून अधिक बचत

Research Hub International Journal

गटांतील महिला

**संशोधन एकक :** त्या गटांमध्ये सक्रिय सहभागी असलेल्या महिला

**नमुन्याचा आकार :** ८० महिला

नमुना पद्धती : Non - Probability Sampling (Convenience sampling)

**उद्दिष्टे (Objectives) :**

- बचत गटांमुळे महिलांच्या उत्पन्नात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.
- महिलांच्या आर्थिक स्वावलंबनात झालेली वाढ समजून घेणे.
- महिलांच्या बँकिंग व्यवहारांमधील बदलांचा अभ्यास करणे.
- कुटुंबातील व सामाजिक निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग मोजणे.
- बचतगटांद्वारे महिलांचे सक्षमीकरण मोजण्यासाठी गुणात्मक व संख्यात्मक विश्लेषण करणे.

**संशोधन पद्धती (Research Methodology) :**

**संशोधन प्रकार :** मिश्रप्रकार, गुणात्मक व प्रमाणात्मक

डेटा संकलन साधने :

- मुलाखत अनुसूची (Interview Schedule)
- गटचर्चा (Group Discussion)
- निरीक्षण (Observation)

डेटा विश्लेषण :

सांख्यिकीय पद्धतीने विश्लेषण :

वर्णनात्मक विश्लेषण (Descriptive analysis)

Chi-Square चाचणीचा वापर केला गेला.

डेटा विश्लेषण व अर्थ लावणे (Interpretation) :

- ८० पैकी ८५% महिलांनी उत्पन्न वाढीचा अनुभव नमूद केला.
- ६५% महिलांनी स्वत:चा व्यवसाय सुरू केल्याचे सांगितले.
- ७०% महिलांनी कुटुंब निर्णय प्रक्रियेत सहभाग घेतल्याचे नमूद केले.
- ६०% महिलांना बँक व्यवहारातील आत्मविश्वास वाढल्याचे आढळून आले.

गटचर्चांमधून महिलांच्या मानसिक सक्षमीकरणाचे सकारात्मक परिणाम दिसून आले.

Chi-Square चाचणी :

Research Hub International Journal

**गृहितक :**

- $H_0$ (null hypothesis) : बचत गटांचा महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावर कोणताही परिणाम होत नाही.
- $H_1$ (alternative hypothesis) : बचत गटांचा महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावर परिणाम होतो.
- P-Value < 0.05 असल्याने $H_0$ नाकारण्यात आली आणि $H_1$ स्वीकारण्यात आली.
- म्हणजेच बचतगट व महिलांचे आर्थिक सक्षमीकरण यामध्ये स्पष्ट संबंध आहे.

**निष्कर्ष (Conclusion) :**

या अध्ययनामध्ये स्पष्ट झाले की बचत गट हे महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे प्रभावी माध्यम ठरतात. महिलांनी व्यवसाय सुरू करून उत्पन्न वाढवले आहे, बँकव्यवहार सुरळीत केले आहेत, आणि निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेत आहेत. बचतगटांमुळे महिलांमध्ये आत्मविश्वास, आर्थिक शिस्त, आणि सामाजिक एकजूट निर्माण झाली आहे.

**संदर्भ (References) :**


- भारत सरकार (२०२०), राष्ट्रीय महिला सक्षमीकरण अहवाल
- Kulkarni, M. (2019), Gramin Vikas va Mahila Sashaktikaran, Pune University Press
- Deshpande, R. (2018), Women Empowerment through SHGs, Sage Publications
- Government of Maharashtra Reports – SHG Impact Studies
- प्राथमिक माहिती – कामठी नगर परिषद अंतर्गत महिलांशी प्रत्यक्ष मुलाखती


Research Hub International Journal